14-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 13-04-2025 22:29 Page 1



## निवडक

### राज्यपालांकडून गोव्यातील लोकांना विशूच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** गोव्याचे राज्यपाल पीएस श्रीधरन पिल्लई यांनी गोव्यातील लोकांना विशेषत: केरळ बांधवांना विशूच्या हार्दिक शुभेच्या व्यक्त केल्या आहेत. आपल्या संदेशात राज्यपाल म्हणतात, विशु हा केरळातील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे आणि तो हिंदू मल्याळी लोक साजरा करतात. या सणाने पारंपारिक नव्या वर्षाची सुरुवात होते. हा सण धार्मिक विधी आणि रीतिरिवाजांसह साजरा केला जातो. या सणात पाळल्या जाणाऱ्या पारंपारिक विधी समृद्धीचे आणखी एक वर्ष घेऊन येते. हा सण लोकांमध्ये मैत्री आणि परस्पर समंजसपणाची नवी भावना निर्माण करतो आणि आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांना एक नवीन अर्थ देतो.
या वर्षाचा विशू सण आपण सर्वांसाठी अधिक आनंद आणि भरभराट घेऊन येवो, असे राज्यपाल आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

---

### 'स्किल-ऑन-व्हील्स' उपक्रमाला सुरुवात


■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** औद्योगिक आणि व्यावसायिक सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते स्किल-ऑन-व्हील्स' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. २ कोटी रुपये खर्चून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन सुरक्षितता कौशल्ये विकसित करणे आहे. बांबोळी येथील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम येथे आयोजित गोवा व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य प्रदर्शन व शिखर परिषद २०२५ च्या उद्घाटन सोहळ्यात या उपक्रमाची सुरुवात झाली. कारखाने आणि बॉयलर्स निरीक्षकांनी आयोजित केलेल्या या तीन दिवसीय परिषदेत कारखाने आणि बॉयलर्स मंत्री नीलकंठ हळर्णकर , सचिव (कारखाने आणि बॉयलर्स) संजीत रॉड्रिग्ज, तसेच मुख्य निरीक्षक अनंत पांगम उपस्थित होते. मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी 'स्किल-ऑन-व्हील्स' या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, या प्रशिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रत्यक्ष औद्योगिक सुरक्षिततेचे ज्ञान मिळेल, जे भविष्यात एक सुरक्षित आणि मजबूत गोवा घडविण्यास मदत करेल. हा उपक्रम आगामी काही महिन्यांत शैक्षणिक संस्था, स्थानिक उद्योग, तसेच सामुदायिक गटांशी समन्वय साधून विविध तालुक्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. मोबाईल प्रशिक्षण युनिटच्या माध्यमातून औद्योगिक सुरक्षिततेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये औद्योगिक अग्नि सुरक्षा, विद्युत धोका व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यावर विशेष भर,विद्यार्थ्यांना सुरक्षा प्रोटोकॉल आणि आपत्ती तयारीसंदर्भात मूलभूत प्रशिक्षण देणे, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील कामगारांना सुरक्षिततेचे अद्ययावत प्रशिक्षण उपलब्ध करणे अशी या उपक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी नमूद केले की, हा उपक्रम केवळ शहरी भागापुरता मर्यादित न राहता ग्रामीण स्तरावरही औद्योगिक सुरक्षा शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न आहे. तरुण आणि कामगारांमध्ये सुरक्षिततेबाबतची जाणिव वाढवून त्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडविणे हेच या उपक्रमाचे अंतिम ध्येय आहे.

---

### फास्ट फूड रेस्टॉरंट्सवर कारवाई; चार आस्थापनांना बंद करण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १० :** राज्यातील फास्ट फूड रेस्टॉरंट्सच्या स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा कडक इशारा आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी दिला आहे. ग्राहकांच्या आरोग्यासोबत कुणीही खेळ करू नये, तसेच प्रत्येक आस्थापनेने स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.
आरोग्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आश्वे - मोरजी परिसरातील एकूण १९ रेस्टॉरंट्सवर धाडसत्र राबवले. यामध्ये चार आस्थापनांमध्ये गंभीर स्वच्छता समस्या आढळल्याने त्यांना तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले.
अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत उर्वरित रेस्टॉरंट्समध्ये स्वच्छतेची स्थिती समाधानकारक आढळली, मात्र चार रेस्टॉरंट्सच्या किचनमध्ये अस्वच्छता आणि आरोग्यधोका असल्याचे आढळून आले. त्यामुळे संबंधित आस्थापनांना स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्या पूर्ण होईपर्यंत त्यांना व्यवसाय सुरू करण्यास परवानगी दिली जाणार नाही. पेडणे तालुक्यात याआधीही अनेक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी स्थानिक तसेच बिगर-गोमंतकीय व्यावसायिकांनी त्यांच्या आस्थापनांमध्ये स्वच्छता मोहीम राबवली होती. मात्र, नियमांचे पालन न करणाऱ्या व्यवसायिकांवर भविष्यातही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.
राज्यातील खाद्य व्यवसायिकांनी आपल्या रेस्टॉरंट्सची स्वच्छता आणि ग्राहकांच्या आरोग्याची जबाबदारी घेतली पाहिजे. अन्यथा, अशा आस्थापनांवर नियमितपणे छापे टाकून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# रस्त्यांचे खोदकाम वाहतूकदारांसाठी डोकेदुखी

## तूये आयटीआय परिसरात ३० एमएलडी क्षमतेचा जलप्रकल्प कार्यान्वित होणार

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १३ :** मांद्रे मतदारसंघातील दीर्घकालीन पाणीटंचाई दूर करण्यासाठी तूये आयटीआय परिसरात खास ३० एमएलडी क्षमतेचा जलप्रकल्प उभारण्यात येत आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यान्वित होणार असून, त्यानंतर मतदारसंघातील पाणीपुरवठा सुरळीत होण्याची अपेक्षा आहे. सुमारे ८० कोटींच्या खर्चाने उभारल्या जात असलेल्या या प्रकल्पाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे.

या जलप्रकल्पासाठी जलवाहिनी टाकण्याच्या कामामुळे सध्या तूये ते पार्से मार्गावरील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर रस्ते खोदकाम सुरू आहे. गेल्या वर्षी भूमिगत वीजवाहिनी टाकल्यानंतरही अनेक रस्त्यांचे दुरुस्ती काम नीट झाले नाही. डांबरीकरण किंवा हॉट मिक्स प्रक्रिया न झाल्याने हे रस्ते खराब अवस्थेतच राहिले. याच मार्गावर पुन्हा जलवाहिनी टाकण्यासाठी खोदकाम सुरू झाल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

या संदर्भात स्थानिक आमदार जीत आरोलकर यांनी माहिती देताना सांगितले की, मांद्रे मतदारसंघासाठी सध्या १४ एमएलडी पाण्याची गरज आहे, मात्र पुढील ५० वर्षांचा विचार करून ३० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारण्यास सरकारने मान्यता दिली आहे. तूये आयटीआय परिसरात उभारला जाणारा प्रकल्प डिसेंबरपर्यंत पूर्णत्वास जाईल. तोपर्यंत पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे.

सध्या तूये आयटीआय ते पार्से, आगरवाडा, चोपडे आणि मांद्रेपर्यंत जलवाहिनी टाकण्यासाठी खोदकाम सुरू असून काही भागांमध्ये जलवाहिनी टाकल्यानंतर लगेच रस्ते बुजवले जात आहेत. मात्र, हॉट मिक्स डांबरीकरण उशिरा होणार असल्याने हे रस्ते पावसाळ्यात अपघातप्रवण होऊ शकतात. या मार्गावर सध्या सोलिंग काम सुरू आहे आणि दिवाळीनंतर संपूर्ण हॉट मिक्स डांबरीकरण केले जाईल, असे आश्वासन आमदार आरोलकर यांनी दिले.

दरम्यान, गेल्या नोव्हेंबर महिन्यात तूये आयटीआय ते पार्से हॉस्पिटल दरम्यान टाकण्यात आलेल्या जलवाहिनीच्या खोदकामानंतर रस्त्यांचे हॉट मिक्स अद्याप झालेले नाही. या प्रश्नावर माजी सरपंच निलेश कांदोळकर यांनी नाराजी व्यक्त करत, कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे रस्त्यांचे डांबरीकरण लांबणीवर टाकले गेले आहे. परिणामी, नागरिक आणि वाहनचालकांना पुन्हा अपघाताच्या धोक्याचा सामना करावा लागणार आहे, अशी टीका केली. स्थानिक नागरिकांकडून सध्या सुरू असलेल्या कामांवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने रस्ते पुनर्बांधणी न झाल्यास शासन आणि लोकप्रतिनिधींना त्याचा राजकीय फटका बसण्याची शक्यता आहे.

## २०२७ मध्ये नावेली भाजपच जिंकेल : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**नावेली, दि. १३ :** मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शनिवारी नावेली मध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करत २०२७ मध्ये नावेली विधानसभा मतदारसंघात कमळ फुलेल असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी स्पष्ट केले की, सरकार सर्व नागरिकांसाठी, त्यांच्या धार्मिक किंवा जातीय पार्श्वभूमीपासून अगदी निरपेक्षपणे कार्य करत आहे, आणि ख्रिश्चन समुदायाला भाजपाला मतदान करण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, आम्ही जात, पंथ आणि प्रदेशाच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्व ४० विधानसभा मतदारसंघांमध्ये समान विकास साधला आहे. अल्पसंख्याक समुदायाच्या क्षेत्रांमध्येही आम्ही विकासाची गती कायम ठेवली आहे आणि एके दिवशी नुवे, बाणावली आणि वेळ्ळी या जागांवर देखील भाजपाचे उमेदवार निवडून येतील .

त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, सरकारने सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या अवशेषांचे प्रदर्शन आयोजित करत २५०-३०० कोटी रुपयांचा निधी खर्च केला, ज्यामुळे या धार्मिक कार्यक्रमाचे सुरळीत आयोजन होऊ शकले. चर्चेनेही सरकारच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आहे, हे दर्शवते की आमचे सरकार सर्वधर्मनिरपेक्ष आहे आणि कोणत्याही धर्माच्या अनुयायांसाठी समान आदर राखते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी भाजपाच्या योजना सर्वांसाठी आहेत, असा ठाम विश्वास व्यक्त करत, ईशान्येकडील भाजपाच्या ९० टक्के ख्रिश्चन लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्येही भाजपला यश मिळाले आहे. त्याचप्रमाणे, गोव्यातही आम्ही प्रत्येकासाठी समान योजनांचा लाभ देत आहोत, असे ते म्हणाले.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयाच्या संदर्भात त्यांनी सांगितले की, २०२७ मध्ये नावेली मध्ये पुन्हा भाजपाचे विजयचिन्ह म्हणजेच कमळ फुलेल. आमच्या सदस्यसंख्येच्या वाढीमुळे आम्हाला भविष्याबद्दल विश्वास आहे. २०२२ मध्ये आम्ही ही जागा ५२०० मतांनी जिंकली होती आणि आता सदस्यसंख्या ९००० झाली आहे. आम्ही खात्री बाळगतो की भाजपाच्या कामगिरीवर विश्वास ठेवणारे मतदात्यांचे मोठे प्रमाण आगामी निवडणुकीतही भाजपाला विजय मिळवून देईल,असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री सावंत यांनी कार्यकर्त्यांना सरकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करत, गोव्यातील रस्ते आणि पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी सरकारने ३०,००० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे, असे सांगितले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी भाषणात उल्लेख केला की, एक काळ असा होता की नावेली मध्ये कोणीही निवडणूक लढवू इच्छित नव्हते, पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. कार्यकर्त्यांना देश आणि पक्षासाठी निःस्वार्थपणे काम करण्याचे आवाहन करत दामू नाईक यांनी भाजपाच्या कामावर आधारित विजयासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नावेलीचे आमदार उल्हास तुयेकर यांनी बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्यासह लोकांच्या काही समस्या मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या.

## आर्लेम-नुवे बायपास अंधारातच; सुरक्षिततेच्या दृष्टीने धोका कायम

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** दक्षिण गोव्याच्या वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा असलेला आर्लेम-नुवे बायपास अद्यापही अंधारात असून, या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे स्ट्रीट लाइट्स नसल्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना गंभीर सुरक्षिततेच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.स्थानिक रहिवाशांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कृती करण्यात आलेली नाही. परिणामी, या मार्गाचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वार, पादचारी आणि वाहनचालकांसाठी हा रस्ता अत्यंत धोकादायक ठरत आहे.

नुवेचे रहिवासी पीटर कोलाको यांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी हा रस्ता मृत्यूचा सापळा बनतो. रस्त्यावरील दिव्यांचा पूर्ण अभाव आहे. वेगाने जाणारी वाहने, अंधार व खराब दृश्यता यामुळे प्रत्येक प्रवास भयावह ठरतो. आम्ही अनेकदा तक्रारी केल्या, पण अजून कोणतीही कृती झालेली नाही.संबंधित बायपास हा आर्लेम ते नुवेदरम्यानचा छोटा पण वाहतूकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा मार्ग आहे. याचा उपयोग फातोर्डा, गोगोळ , राय आणि आसपासच्या परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर करत असतात.

रस्त्याच्या कडेला असलेली झुडपे, टाकलेला कचरा आणि वळणावळणाचा रस्ता अंधारात अधिकच गुंतागुंतीचा वाटतो. वाहनांचे हेडलाइट्स सतत हाय बीमवर ठेवले जात असल्याने समोरून येणाऱ्या चालकांना अंधुक दिसते, पण तरीही वाहनांचा वेग कमी होत नाही.स्थानिक रहिवासी मेनिनो क्वाड्रोस यांनी अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त करत सांगितले की, फक्त आश्वासनं दिली जातात, पण प्रत्यक्षात काहीही होत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर नागरिक हा रस्ता वापरत आहेत आणि दररोज धोका पत्करत आहेत.

पावसाळ्याच्या दिवसात ही परिस्थिती अधिकच बिकट होते. धुक्यामुळे आणि विंडशील्डवर बसलेल्या थेंबांमुळे दृश्यता अत्यंत मर्यादित होते. काहीतरी दुर्दैवी घटना घडल्याशिवाय अधिकारी जागे होणार नाहीत का? असा सवाल रितेश शिरोडकर या नियमित प्रवाशाने उपस्थित केला.या समस्येला आणखी गडद करण्याचे काम काही पोल्ट्री विक्रते करत असून, ते रस्त्यालगत चिकनचा कचरा टाकतात. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी आणखी एक धोका निर्माण झाला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था याबाबत अद्याप गप्प आहेत. ना कोणतीही योजना जाहीर झाली आहे, ना स्ट्रीट लाइट्स बसवण्याच्या दृष्टीने काही हालचाल दिसून येत आहे.रहिवाशांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत मूलभूत सुविधा पुरविल्या जात नाहीत, तोपर्यंत दररोजचा प्रवास म्हणजे अंधारात जीवघेणा प्रवासच ठरणार आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, अन्यथा गंभीर अपघात अथवा अनुचित घटना घडल्याशिवाय जाग येणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे.

## आयडीसीच्या ठेक्यांमध्ये पक्षपाताचा आरोप; आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १३ :** गोवा औद्योगिक विकास महामंडळ (जीआयडीसी) ठेक्यांच्या वाटपात पारदर्शकतेचा अभाव आणि स्थानिक कंत्राटदारांना दुर्लक्षित केल्याचा आरोप करत ऑल गोवा एक्स्कॅव्हेटर ओनर्स असोसिएशनने राज्य सरकारला तीव्र इशारा दिला आहे. शनिवारी वास्को येथे आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेच्या प्रतिनिधींनी या मुद्द्यावर नाराजी व्यक्त करत तातडीने हस्तक्षेप न झाल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आयडीसीच्या विविध साइट्सवरील सरकारी उत्खनन प्रकल्पांचे ठेके काही निवडक, बाहेरील कंत्राटदारांना दिले जात आहेत. हे कंत्राटे गुणवत्तेऐवजी ओळखी आणि राजकीय संबंध यांच्या आधारावर वितरित केल्याचा आरोप त्यांनी केला.

आम्ही सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत आहोत, तरीही आम्हाला सातत्याने दुर्लक्षित केले जातं. ही प्रक्रिया पूर्णतः पक्षपाती आहे, असे संघटनेतील एका ज्येष्ठ सदस्याने सांगितले. संघटनेच्या म्हणण्यानुसार, गोव्यातील स्थानिक ऑपरेटरना डावलून काही निवडक गटांना सातत्याने संधी दिली जात आहे. या संदर्भात आवाज उठवला असता काही सदस्यांना हेतुपुरस्सर त्रास दिला जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. अनियमिततेविरोधात आवाज उठवणाऱ्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जाते. ही परिस्थिती खपवून घेण्यासारखी नाही, असे या क्षेत्रात दीर्घ अनुभव असलेले सदस्य श्री. भोबे यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात ऑल गोवा ट्रक ओनर्स असोसिएशनने देखील आपला पाठिंबा जाहीर केला असून, स्थलांतरित कंत्राटदारांवर वाढती अवलंबित्व आणि स्थानिक कामगारांसमोर निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी आम्हाला या बाबतीत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र लवकरच ठोस पावले उचलली गेली नाहीत, तर कामगारांमध्ये वाढती असंतोषाची भावना सामाजिक अस्थिरतेचे कारण ठरू शकते, असा इशारा एका प्रतिनिधीने दिला.

संघटनेने गोवा आयडीसीकडून ठेक्यांच्या वाटप प्रक्रियेची स्वतंत्र व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, स्थानिक कामगार व कंत्राटदारांना संधी मिळावी यासाठी धोरणात्मक बदल घडवून आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. काही आयडीसी अधिकाऱ्यांनी पक्षपात केल्याच्या गंभीर आरोपांवरून त्यांच्या राजीनाम्याचीही मागणी संघटनेने केली आहे.सरकारने जर वेळेवर हस्तक्षेप केला नाही, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल,असा स्पष्ट इशारा संघटनेच्या प्रवक्त्यांनी दिला.

येत्या काही दिवसांत मुख्यमंत्री तसेच संबंधित शासकीय विभागांना अधिकृत निवेदन सादर करण्यात येणार असून, त्यात या प्रश्नावर तातडीने आणि निष्पक्ष तोडगा काढण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

## अनधिकृत बांधकाम नियमितीकरणासाठी पंचायतीकडून मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ टीम दैनिक हेराल्ड



**कळंगुट, दि. १३ :** हडफडे - नागवा ग्रामस्थांनी त्यांच्या घरांचे व व्यवसायिक अनधिकृत बांधकाम वाचवण्यासाठी ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे . याबाबत सरपंच रोशन रेडकर यांनी रविवारी झालेल्या ग्रामसभेत सांगितले की, अनधिकृत बांधकाम नियमितीकरणासाठी गोवा सरकारकडे अधिकृत निवेदन पाठवले जाईल.

रेडकर म्हणाले की, गोवा अनधिकृत बांधकाम नियमितीकरण कायदा २०१६ अंतर्गत सर्व बाधित बांधकामे नियमित करण्यासाठी उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवले जाईल. त्यांनी ग्रामस्थांसमोर प्रस्तावित पत्र वाचून दाखवले आणि सर्व बाधित रहिवाशांनी त्यावर स्वाक्षऱ्या कराव्यात, असे आवाहन केले.

ग्रामसभेदरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, अनधिकृत बांधकामांच्या मुद्द्यावर ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली. एका सिव्हिल इंजिनिअर असलेल्या रहिवाशाने नमूद केले की, राज्यातील बहुतांश घरे व व्यावसायिक आस्थापना बेकायदेशीर आहेत. पंचायत व निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या संमतीने ही बांधकामे झाली असून, त्यांना व्यापार परवानेदेखील मिळाले आहेत. मात्र यामागे टीसीपी मान्यता वा बांधकाम परवान्याचा विचार झालेला नाही.यावर प्रत्युत्तर देताना सरपंच रेडकर यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या पंचायत कार्यकाळात कोणतेही अनधिकृत बांधकाम झालेले नाही. या सर्व बांधकामांची मुळे २० वर्षांपूर्वीच्या काळात आहेत.

गावकऱ्यांनी सांगितले की, रोजगाराच्या मर्यादित संधींमुळेच त्यांना घर व दुकानांसाठी बांधकामे करावी लागली. सरकारकडून कोणतीही स्थिर नोकरी मिळत नाही आणि इतर कामांमध्ये फार कमी उत्पन्न असते, असे त्यांनी सांगितले.

रेडकर यांनी सांगितले की, पंचायत स्तरावर जे काही शक्य असेल ते मदतीसाठी केले जाईल. त्यांनी वाचून दाखवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गावातील बहुतांश बांधकामे वडिलोपार्जित जमिनीवर परवानगीशिवाय झाली आहेत, त्यामागे अज्ञान वा अधिकाऱ्यांचा अभाव होता.

गावकऱ्यांनी २०१६च्या कायद्यानुसार अर्ज करण्यासाठी मुदतवाढीची मागणी करत म्हटले की, बांधकामे अनधिकृत असली तरी आम्ही कोणतेही बेकायदेशीर कार्य करत नाही. आम्ही येथे आमच्या कुटुंबांसोबत राहतो आणि आमची दुकाने गावाच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा भाग आहेत.

## १०० कोटींच्या घोटाळ्यात मुख्य आरोपींच्या मालमत्ता जप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** शेअर बाजाराशी संबंधित १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या फसवणूक प्रकरणात मोठी कारवाई करत गोवा सरकारने मुख्य आरोपी मायरॉन रॉड्रिग्ज व त्याची पत्नी दीपाली परब यांच्या गोवा आणि महाराष्ट्रातील सात मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने दिलेल्या शिफारशींनुसार, वित्त विभागाने संबंधित मालमत्तांवर तात्पुरती जप्ती आणली असून त्या मालमत्ता पुढील आदेश येईपर्यंत दक्षिण गोव्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात राहणार आहेत.

जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांमध्ये गोवा, मुंबई, ठाणे आणि पुणे येथील निवासी मालमत्तांचा समावेश आहे. यामध्ये गोव्यातील नुवे व कुठ्ठाळी येथील एक व्हिला व एक अपार्टमेंट, मडगाव फातोर्डा येथील दुसरा व्हिला, तसेच वडाळा (मुंबई) येथील दोन फ्लॅट, ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील एक फ्लॅट व पुण्याच्या लवासा येथील एक फ्लॅट यांचा समावेश आहे.

याशिवाय, मायरॉन रॉड्रिग्ज व दीपाली परब यांच्या नावावरील एकूण ४४.४६ लाख रुपयांची बँक ठेवीही गोठवण्यात आल्या आहेत. या खात्यांमध्ये मायरॉन यांचे पाच खाती असून त्यात अनुक्रमे रु. ६७,९९३, रु. ३१९, रु. ३३,४११, रु. ७,१६८ आणि रु. ८५,८६९ इतक्या रकमा आहेत. दीपाली यांच्याच्या नावावर असलेल्या खात्यांमध्ये रु. १,८५,२८४, रु. २,२२,६७७, रु. ५,९४१ तसेच इतर खात्यांमध्ये अनुक्रमे रु. २६,४५९, रु. १०,९२,३७९, रु. २१,८४,७५७ व रु. ५,४६,१८४ इतकी रक्कम शिल्लक आहे.

गोवा ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (वित्तीय आस्थापनांमध्ये) कायदा, १९९९ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. मालमत्तांच्या जप्तीमागे उद्देश असा की, आरोपी मालमत्ता विकून किंवा लपवून ठेवू शकणार नाहीत आणि फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीची परतफेड सुनिश्चित करता येईल.

फसवणुकीच्या या प्रकरणात मायरॉन रॉड्रिग्ज (सध्या फरार) व त्यांची पत्नी दीपाली परब (न्यायालयीन कोठडीत) यांच्यासह आणखी काही आरोपींविरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ४०६ (गुन्हेगारी विश्वासघात), ४२० (फसवणूक), ३४ (सामूहिक हेतू) तसेच गोवा ठेवीदार संरक्षण कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, स्थानिक ज्येष्ठ नागरिक इव्हॉन सुरेश जोकिम अल्मेडा यांची १रु. १९ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याच्या प्रकरणातही अलीकडेच दोन गुंतवणूक फसवणूक प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणातील अन्य आरोपींमध्ये मायरॉनची माजी पत्नी सुनीता रॉड्रिग्ज, नोलन लॉरेन्स अँटाओ, जोकिम रोसारियो पायरेस, विजय दत्तात्रय जोइल, नवनिक मारियो परेरा आणि सुशांत मनोहर घोडगे यांचा समावेश आहे.

सुनीता रॉड्रिग्ज यांना ७ डिसेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली होती व त्यानंतर २० दिवसांत त्यांना सशर्त जामीन मिळाला. इतर आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत.